# लवाद यांचे कार्यालय,

नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४

## नगर रचना परियोजना क्र. ८, नैना

(आंबिवली, बेलवली, चिखले, लोणीवली, मोहो, पाली खुर्द आणि वांगणी तर्फे वाजे)

जा. क्र.- लवाद/न.र.यो-८/ जाहीर सूचना/२०२५ / 604 दि. ०७/०२/२०२५

## जाहीर सूचना

शहर व औदयोगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) यांनी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून तयार केलेल्या व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६८(२) प्रमाणे मंजूर केलेल्या प्रारुप नगर रचना परियोजना क्र. ८, नैना (आंबिवली, बेलवली, चिखले, लोणीवली, मोहो, पाली खुर्द आणि वांगणी तर्फे वाजे) चे लवादीय कामकाज कलम ७२(४) प्रमाणे सुरु आहे. या संदर्भात महाराष्ट्र नगर रचना नियम १९७४ च्या नियम क्रमांक १३(३) प्रमाणे विहीत नमुना ४ मध्ये विशेष सूचना परियोजनेतील प्रत्येक भूखंडधारकाला पाठविलेली आहे. परंतु रहिवासाचे ठिकाण बदलल्यामुळे किंवा अन्य काही कारणांमुळे उक्त विशेष सूचना काही भूखंड धारकांना मिळालेली नाही.

दि. ९/१२/२०२४ ते दि २४/०१/२०२५ या कालावधीत नगर रचना परियोजना क्र. ८, नैना मधील उपस्थित भूखंडधारकांची सुनावणी पूर्ण झाली आहे. तरी ज्या भूखंडधारकांना अशी विशेष सूचना मिळालेली नसेल किंवा जे भूखंड धारक सुनावणीस उपस्थित राहू शकले नसतील त्यांना या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, अशा भूखंडधारकांनी आपल्या हरकती/सूचना लेखी स्वरूपात अदयावत ७/१२, गट बुक नकाशे, इतर संबंधित कागदपत्रे आणि आधारकार्डाच्या प्रतींसोबत लवाद कार्यालयात एक महिन्याच्या आत सादर करावेत.

सदर परियोजनेचा अहवाल व नकाशे सिडकोच्या (https://cidco.maharashtra.gov.in/naina) या संकेतस्थळावर माहितीस्तव उपलब्ध आहे.

(आशा डहाके)<br>
लवाद,<br>
नगर रचना परियोजना क्र. ८, नैना